# आमच्याबद्दल

महाराष्ट्र राज्यातील परभणी शहर हे परभणी जिल्ह्याचे मुख्यालय आहे. परभणी शहर महानगर पालिकेची स्थापना सन 2011 साली झालेली आहे. परभणी शहर महानगर पालिका "ड" वर्ग महानगर पालिका असून शहराचे क्षेत्रफळ 57.61 चौ.किलोमिटर आहे. परभणी शहराची समुद्र सपाटी पासून सरासरी उंची 538 मीटर एवढी आहे. परभणी शहरातील एकुण रस्त्यांची लांबी 692 कि.मी. एवढी आहे. परभणी शहराचे सरासरी पर्जन्यमान सरासरी 750 मि.मी. ऐवढे आहे. परभणी शहराची 2011 च्या. जनगणनेनुसार लोकसंख्या 307170 असून पुरुष 157625 व महिला 149563 लोकसंख्याख आहे. 6 वर्षाखालील बालकांची लोकसंख्या 18888 म्हणजेच परभणी शहराच्या 6.15% एवढी आहे. स्त्री-पुरूष लिंग गुणोत्तर 948 असून ते महाराष्ट्र राज्याच्या 929 सरासरी लिंग गुणोत्तसरापेक्षा जास्त आहे. परभणी शहराची साक्षरता प्रमाण 73.34% आहे, जे की महाराष्ट्र राज्याच्या 82.34% सरासरी साक्षरता प्रमाणापेक्षा कमी आहे.

परभणी शहर हे विभागीय आयुक्तक कार्यालय, औरंगाबाद पासुन 210 कि.मी. अंतरावर आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र 222 (कल्याण – निर्मल ) यावर स्थित आहे. परभणी शहर हे मनमाड काचीगुडा या रेल्वे लाईन वर तसेच परभणी – परळी या रेल्वे मार्गाच्या जंक्शनवर आहे तसेच परळी वैजयनाथ व औंढा नागनाथ या धार्मिक स्थळा पासून 72 कि.मी. व 50 कि.मी. अंतरावर आहे. शहरात हजरत तुराबुल हक्क दर्गा तसेच पारदेश्वर मंदिर असे प्रेक्षणिय स्थळे असून वसंतराव नाईक कृषी विद्यापिठा मुळे परभणी शहराची शैक्षणिक दृष्ट्या वेगळी ओळख आहे . या शहरात मुख्यतः मराठी, हिंदी, दखनी उर्दू, मारवाडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. या शहराचे प्रमुख वैशिष्ट्थ म्हणजे या ठिकाणी 110 वर्षा पासून प्रसिद्ध संत हजरत तुराबुल हक्क यांच्या नावाने दर वर्षी 02 फेब्रुवारी ला उर्स (जत्रा) भरतो. परभणी परिसरात प्रामुख्यावने ऊस, कापूस, ज्वा री, गहू, सोयाबीन या सारखी सर्व पिके मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते.

## कार्यालयाचा पत्ता

**आमचा कार्यालयाचा पत्ता**

स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ,

परभणी - ४३१४०१

**प्रभाग समिती 'अ'**

नटराज रंगमंदिर, जुना मोंढा,
परभणी

pcmcparbhani@gmail.com

**प्रभाग समिती 'ब'**

नगर परिषद जुनी इमारत,
स्टेशन रोड, परभणी
pcmcparbhani@gmail.com

**प्रभाग समिती 'क'**

कल्याण मंडप, जयकवाडी वसाहत,
करेगाव रोड, परभणी
pcmcparbhani@gmail.com

**कार्यालयीन कामकाजाची वेळ**

सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:३० (सोमवार ते शुक्रवार) शनिवार, रविवार व शासकीय सुट्ट्या - बंद

**अग्निशमन संपर्क**

दूरध्वनी क्रमांक: **०२४५२-२२३१०१**
टोल फ्री क्रमांक: **१०१**
मोबाईल क्रमांक: **९८६३१०११०१**